नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 02/07/2020 (गुरूवार)
(सकाळ)

## चोरी

पो.स्टे. कुही :– माहे डिसेंगर 2019 ते दिनांक 15/02/2020 दरम्यान पाचगाव शिवारातील बंद पडलेल्या काळे क्रेशर खदान वरूण 100 ट्रक डस्ट किमती 3,00,000/– रू.व 10 ट्रक गिट्टी किमती 50,000/– रू. असा एकुण 3,50,000/– रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी नामे– मधुकर शेषराव काळे, रा. गांधी गेट महाल, नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि कमलेश सोनटक्के 9422644538 हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

1) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर टेंभरी दिनांक 29/06/2020 चे 17.00 वा. ते दिनांक 30/06/2020 चे 07.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मंगेश टिकाराम बोरकर, वय 32 वर्ष, रा. टेंभरी ता. हिंगणा जि.नागपुर याने त्याची एमएच–31/ सीटी–8483 क्रमांकाची काळया रंगाची हिरोहोन्डा हन्क मोटरसायकल रुमच्या समोर ठेवली होती. दरम्यान अज्ञान आरोपीने फिर्यादींची कि. 20,000/–रु. ची मोटरसायकल चोरुन नेली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ तलमले पोस्टे एमआयडसी बोरी हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 3 कि. मी. अंतरावर खापरखेडा दिनांक 28/06/2020 चे 10.00 वा. ते दिनांक 30/06/2020 चे 14.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिपक मोरबाजी निखाडे, वय 30 वर्ष, रा. भानेगाव, वार्ड क्र. 5 याने त्याची एमएच–40/ एव्ही–7208 क्रमांकाची लाल रंगाची डिलक्स मोटरसायकल माऊली ट्रेडर्स समोर ठेवली होती. दरम्यान अज्ञान आरोपीने फिर्यादींची कि. 25,000/–रु. ची मोटरसायकल चोरुन नेली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक पिपरोदे 9921711955 पोस्टे खापरखेडा हे करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 8 कि.मी अंतरावर मौजा दहेगाव (रंगारी) येथे दिनांक 16/06/2020 चे 09:00 वा. ते दिनांक 01/07/2020 चे 13:30 वा. दरम्यान 30 वर्षीय फिर्यादी हिचा मित्र आरोपी नामे– फ्रॅक विलीयम्स, रा. स्कॉटलॅड याने स्काटलॅड वरून किंमती गिफ्ट पाठवतो असे म्हणुन फिर्यादीस गिफ्टचा कस्टम चार्ज 1,30,000/– रू भरण्यासाठी वारंवार फोन करून पैसे भरण्याच्या तकादा लावुन गिफ्ट चांगले व किंमती आहे असे सांगुन फिर्यादीचा विश्वास घात करून तिची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 406, 420 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री शेवाळे पो स्टे खापरखेडा मो. नं. 9421320411 हे करीत आहे.

## आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीविरूद्ध कार्यवाही

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 05 कि.मी. अंतरावर क्वार्टर क्र. 13/05, बजाज कॉलनी डब्ल्यु.सी.एल. वाघोडा येथे दिनांक 21/05/2020 चे 20.00 वा. पुर्वीपासुन आरोपी नामे क्र. 1) दिनेश रमेश सालंकी, रा. वाघोडा सावनेर याने फिर्यादी नामे – रामकिशन घुडीया मानकर, वय 54 वर्ष, रा. पालखेड, ता. मोहखेड, जि. छिंदवाडा (म.प्र.) यांची मुलगी मृतक नामे– सौ. अश्विनी दिनेश सोलंकी, वय 22 वर्ष हिच्या सोबत दि. 23/05/2019 रोजी लग्न केले होते. आरोपी क्र. 1) दिनेश रमेश सालंकी, 2) सौ उर्मिला रमेश सोलंकी व 3) रमेश होनीलाल सोलंकी, सर्व रा. क्वार्टर नं 13/05 बजाज कॉलनी वेकीली वाघोडा सावनेर यांनी संगनमत करून तिच्या चारित्र्यावर संशय घेवुन तसेच तिला माहेरून मोटरसायकल व 3 तोळे सोण्याची मागणी करून मागणी पुर्ण न झाल्याने तिला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला. सदर त्रासाला कंटाळुन तिने दिनांक 21/05/2020 रोजी 08.00 वा. दरम्यान स्वतःच्या अंगावर रॉकेल टाकुण जाळुन घेतले. दिनांक 24/06/2020 रोजी संध्याकाळी 06.15 वा. दरम्यान शासकीय वैधकीय महाविद्यालय नागपुर येथे तिचा उपचारा दरम्यान मृत्यु झाला. सदर प्राप्त कागदपत्रावरून मर्ग क्रं. 33/20 कलम 174 जाफौ वरून व फिर्यादीचे रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ती जळुन मरण्यास आरोपी हे कारणीभुत ठरले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन व मर्गच्या तपासात वरील नमुद आरोपी कारणीभूत असल्याचे निष्पन्न झाल्यावरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपी विरुध्द कलम 304 (ब), 306, 34 भादंवी. सहकलम 4 हुंडा प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. फुलेकर 8588564300 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर